# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXIV | DECEMBER 2022 | No. 11


### पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

**लूक : १:२६-३३**

२६) नंतर सहाव्या महिन्यांत देवानें गालीलांतील नासरेथ नामें नगरास एका कुमारीकडे ग्रब्रीएल देवदूताला पाठविले.

२७) ती दाविदाच्या घराण्यांतील योसेफ नामें पुरुषाला वाग्दत होती; त्या कुमारीचे नाव मरीया होते.

२८) तेव्हां देवदूत आत तिजकडे येऊन म्हणाला, हे कृपा पावलेल्ये, कल्याण; प्रभु तुजबरोबर असो; (स्त्रियांमध्ये तूं धन्य आहेस)

२९) ती त्या बोलण्यानें फार घाबरली, आणि हे अभिवंदन काय असेल असा विचार करुं लागली.

३०) देवदूतानें तिला म्हटले, मरीये, भिऊं नको, कारण देवाची कृपा तुजवर झाली आहे.

३१) पाहा तूं गरोदर होशील व पुत्र प्रसवशील; त्याचे नांव येशू ठेव.

३२) तो थोर होईल व त्याला परात्पराचा पुत्र म्हणतील; आणि प्रभु देव त्याला त्याचा बाप 'दावीद याचे राजासन' देईल.

३३) तो याकोबाच्या घराण्यावर 'युगानुयुग राज्य करील', त्याच्या राज्याचा अंत होणार नाही.



# ख्रिस्तजन्मदिनाचे आशीर्वाद

## BLESSINGS OF CHRISTMAS!

पास्टर के. आर. राजसेकरन

बहुतेक जग पहिला ख्रिस्तजन्म पहावयास चुकले. त्याची त्यांना जाणीव नव्हती. तो घडला हे देखील त्यांना माहित नव्हते; त्यांना त्याचे महत्व नव्हते. पहिल्या ख्रिस्तजन्म दिनी फारच थोडे लोक तेथे होते. आता २००० वर्षे उलटल्यानंतर संपूर्ण जगाला ख्रिस्त जन्मदिन काय आहे हे माहित आहे. ख्रिस्तजन्मदिन साजरा करण्यास जगभरातील अब्जावधी लोक उपासनेस जातील. मरीया, योसेफ, मेंढपाळ आणि मागी लोक, अशा थोडक्याच जणांना पहिल्या ख्रिस्तजन्माविषयी ठाऊक होते. त्यांच्या त्या पहिले होण्यात काय विशेष असे होते? ज्यांना आशीर्वाद द्यावयाचा, देव त्यांची निवड कशी करतो? देव कोणाला निवडतो आणि त्याचा उपयोग करून घेतो याविषयी क्षणभर विचार करावासा वाटतो.

प्रत्यक्ष, तुम्ही जर मरीया आणि योसेफ, मेंढपाळ आणि मागी या सर्वांनी ज्या गोष्टी केल्या, त्या आता तुम्ही केल्या तर हा ख्रिस्तजन्मदिन तुम्हाला देखील आशीर्वादीत होईल. **कारण तुम्ही जर त्याकडे पाहिले, तर असे दिसेल की, योसेफाने परिणाम घडवून येण्यास सहकार्य केले, मेंढपाळांनी आनंद साजरा केला आणि मरीयेने गंभीरपणे विचार केला; मनन केले आणि मार्गींनी अर्पण केले. आपण एक-एक करुन त्यावर मनन करुया.**

### १) योसेफाने देवाच्या योजनेस सहकार्य केले!


**येशू ख्रिस्ताचा जन्म या प्रकारे झाला. त्याची आई मरीया हिचे योसेफास वाग्दान झाल्यावर ज्यांचा सहवास होण्यापूर्वी ती पवित्र आत्म्यापासून गरोदर झालेली अशी दिसण्यांत आली. तिचा नवरा योसेफ धार्मिक असून तिचा उघड अपमान करावयाची त्याची इच्छा नसल्यामुळे तिला गुप्तपणें सोडण्याचा त्याने निश्चय केला. तो त्या गोष्टींच्या विचारांत आहे तो, पाहा, प्रभूच्या दूतानें त्याला स्वप्नांत दर्शन देऊन म्हटलें, योसेफा, दाविदाच्या पुत्रा, तूं आपली स्त्री मरीया हिचा स्वीकार करावयाला भिऊं नको, कारण तिच्या ठायी जो गर्भ आहे तो पवित्र आत्म्यापासून आहे. ती पुत्र प्रसवेल आणि, आणि तूं त्याचें नाव येशू ठेव, कारण तोच आपल्या लोकांस त्यांच्या पापांपासून तारील. हे सर्व यासाठी झाले की प्रभूनें संदेशष्ट्याच्या द्वारे जे सांगितले होते ते पूर्ण व्हावें; ते असे की, पाहा,**



(...पान ३ वर)

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

(ECHO GROUP)



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



## आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

**CHIEF EDITOR**
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

**MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**ADMINISTRATION**
Bro. N. Prakasam, M.A., General Manager

**EDITORIAL BOARD**
Sis. Jesy Veena Sam
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Dr. A. Richard Samuel, M.A., Ph.D.

**EDITOR, PUBLISHER & PRINTER**
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858

**CORE LEADERS**
Bro. K. Puratchivendan
Bro. A. Edward Durai
Bro. A. Alvin
Bro. K. Abraham
Sis. Dhanalakshmi Chinnaiah

**E.mail ID**
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**WEBSITES**
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

**YOUTUBE CHANNEL**
Echo of His Call

"...जे मिसरी लोक तुम्ही आज पाहत आहां ते पुन: कधीहि तुमच्या नजरेस पडावयाचें नाहीत."
(निर्गमन १३:१४)

अति प्रिय बंधु आणि बहिणींनो,

आपल्या देवाकडून तुम्हाला कृपा आणि शांति असो. आपला प्रभु देव ज्यानें २०२२ या वर्षात आपल्याला आशीर्वाद दिला, तो २०२३च्या पूर्ण वर्षभरात आपल्या सोबत असणार.

देवाच्या कृपेद्वारे तुम्ही सर्व ठीक आहात अशी आम्ही आशा बाळगतो. आम्ही तुम्हां सर्वांना आमच्या सततच्या प्रार्थना आणि विनंत्याद्वारे उचलून धरित आहोत. येणाऱ्या दिवसात देव निश्चितच तुमच्या जीवनात महान अशा गोष्टि करील. आज चमत्कार घडण्यास त्याजवर विश्वास ठेवा!



आमचे निवासी हिंदी विद्यार्थी

आम्ही भारतात आणि शेजारील देशांत शुभवर्तमान नेण्यात अतिशय व्यस्त आहोत आणि या दरम्यान आम्ही **नहेम्या बायबल कॉलेजच्या** विद्यार्थ्यांची मोठ्या हंगामासाठी तयारी करीत आहोत. ते आनंदाने आभ्यास करीत आहेत आणि क्षेत्रीय कार्याचे प्रशिक्षण घेत आहेत. बायबल कॉलेज घेत असलेल्या पुढाकाराबद्दल आम्ही तुमचे आभार मानित आहोत. आभार मानित आहोत. कृपया तसे करणे सुरु ठेवा.


माझ्या अलीकडच्या दक्षिण भारताच्या दिलेल्या भेटित, आम्हाला आमच्या सेवाकार्यातील कांही सहकार्यांशी पुनरुपि संबंध दृढ करता आले.

आम्ही त्यांना त्यांच्या विभागात विनामुल्य वितरणासाठी मोठ्या प्रमाणात शुभवर्तमान हस्तपत्रिका आणि पुस्तिका देवून आशीर्वादीत करु शकलो. आम्ही आमच्या एको ऑफ हिज कॉल शुभवर्तमान प्रेस आणि लेखनसाहित्य कर्मचारी वर्गाबद्दल देवाचे आभार मानित आहेत. त्यांच्या कडून आम्हाला दररोज मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. आम्ही तरुणांकरिता


पास्टर जेकब जेयाकुमार आमचे विल्लुपूयामधील हस्तपत्रिका वाटणारे


बंधु सालोमन मनोहरन, ९९ के.एम्. कॉफी मॅजीकचे व्यापारी आणि खेड्यातील पास्टर मुल्लाईवनन आमचे बायबलकोअर अभ्यासक्रमाचे पदवीधर - चेय्युर


पास्टर जेबा डॅनियल वाल्लीयुर गाव


पास्टर स्टीफन कार्थिक विरुधुनगर गाव

**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) ❂ BIBLECOR - Postal Courses (3 languages) ❂ Online Courses ❂ Theological Correspondence Courses (2 languages) ❂ Church Planting ❂ Nehemiah Bible Colleges ❂ Gospel Printing Press ❂ Great Commission Partners ❂ St. Paul's Matriculation School ❂ Crusades ❂ Community Development

निरनिराळ्या ठीकाणी विशेष शिबीरांचे आयोजन करीत असतो. बहिण अन्जेलीन सेल्वाकुमारी, रेव्ह. डॉ. सनी प्रसाद, रेव्ह. डॉ. आनंद बाबू इत्यादिंचा देव त्यासाठी उपयोग करुन घेत आहे.


बहिण अन्जेलीन सेल्वाकुमारी


रेव्ह. डॉ. सन्नी प्रसाद


रेव्ह. डॉ. आनंद बाबू

प्रिय मित्रांनो, येथे सेवाकार्य करणे सोप बाब नाहि. आम्हाला आमच्या कर्मचारी वर्गातील कुटुंबातील आजारपण, सैतानाचे सरळ होणारे हल्ले, राजकारणातील शक्ति, ख्रिस्त विरोधी घटक, आर्थिक अडचणी इत्यादि सांगता न येणाऱ्या आणि ओळख पटू न शकणाऱ्या दुष्ट शक्तिंचा सामना करावा लागतो. आम्ही खरोखर कठीण परिस्थितीत धडपडत आहोत. केवळ आम्हीच नाहि, तर देवाचे सर्वच खरे सेवक एकाच नावेतुन प्रवासात आहेत. तुमच्यासारखे लोक आम्हांस प्रार्थना आणि आधार देण्यास जोपर्यंत पुढे येत नाही. आम्हाला हरवलेल्या आत्म्यांपर्यंत पोंहचणे कठीण आहे. तेव्हा पुढील गोष्टी करण्याकरिता पुढे या -

१) आमच्या करीता, तसेच सर्व देवाच्या सेवकांकरिता, भारतातील आणि जवळील देशांतील मंडळ्याकरिता पंथाचा विचार न करता **प्रार्थनेच्या वेळात वाढ करा.**

२) आमच्या **एको ऑफ हिज कॉल** सेवेत पाळक, सुवार्तिक, वाद्य वाजविणारा, आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन शाळेत** शिक्षक म्हणून, **नहेम्या बायबल कॉलेज**मध्ये व्याख्याते म्हणून आणि कार्यालयात प्रशासकीय स्टाफ, सुपरवायझर, तंत्रज्ञानी व्यक्ति म्हणून **देवाची सेवा करण्यास सहभागी व्हा.**

३) आमच्या कर्मचारी वर्गाच्या मुलभुत गरजा, छपाईच्या कागदाच्या आणि शाई खरेदी, टपाल खर्च, इमारतीचे भाडे, दुरुस्ती-देखभाल खर्च यांत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे **तुमच्या आर्थिक आधार** देण्यात वाढ करा.

### विभागीय सभा :-

कोविड-१९च्या काळशपासून रविवारच्या आराधना उपासनामध्ये सभासदांच्या उपस्थितीत घट झाल्यामुळे त्यावर उपाय म्हणून आम्ही प्रत्येक शुक्रवारी सायंकाळी ६ ते ७.३० वाजेपर्यंत सभासदाकरीता विभागीय प्रार्थना सुरु केली आहे. त्याद्वारे आमच्या विभागीय पुढाऱ्यांच्या मदतीने विभागीय सभासदांची भेट घेऊन त्यांच्या करीता वैयक्तिक प्रार्थना करीत आहोत. आम्ही त्यांना संपूर्ण कुटुंबासहित येण्याचे आमंत्रण देतो आणि त्यांना त्यांच्या समस्या मांडण्याची परवानगी देऊन त्यांना उत्तेजन देतो. हा प्रयत्न यशस्वी ठरला आहे, कारण मंडळीच्या सभासदांच्या उपस्थितीत वाढ होत आहे. प्रभु येशू ख्रिस्ताचे पवित्र नाम धन्यवादीत असो. देवाच्या कृपेद्वारे मागील वर्षातील महामरीच्या



समयात आम्ही पीडितांना त्यांची जात-धर्म इत्यादी लक्षात न घेता छोट्या प्रमाणात मदत करू शकलो. सध्या देखील सामान्य लोकांना महामरीच्या नंतरच्या परिणामांचा त्रास होत आहे. आम्हाला गरीब लाचार अशा लोकांना वैद्यकीय आणि शैक्षणिक मदत करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. आम्ही प्रार्थना करीत आहोत की देवानें तुमच्या सारखे लोक अशा गरजा पुरविण्या करीता तयार करावेत. देव जर या गरजा करता तुम्हाला प्रेरणा देत असेल तर तुम्ही चेक/डी.डी. **एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**च्या नांवे दान पाठवू शकता. (आम्ही भारतीय दात्यांना इन्कमटॅक्सच्या ८०जी अन्तर्गत कलमा खाली कर माफीची पावती देवू.) **एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट** शासन मान्य धर्मदाय संस्था आहे.

आम्ही तुमच्याकरिता व तुमच्या गरजांकरिता प्रार्थना करीत असतो. देव तुम्हाला २०२३ या येणाऱ्या नवीन वर्षात अधिकाधीक आशीर्वादीत करुन मोठ्या सामर्थ्याने, शक्तिने; शहाणपणाने पुढे जाण्यास सहाय्य करो.

"**परमेश्वर तुला आशीर्वाद देवो व तुझे संरक्षण करो; परमेश्वर आपला मुखप्रकाश तुजवर पाडो व तुजवर कृपा करो; परमेश्वर तुजकडे प्रसन्नमुख करो आणि तुला शांति देवो.**" (गणना ६:२४-२६)

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**

(+91) 98412 71858 / 98410 71858,

E.mail : samselvaraj333@gmail.com

---

(पान १ वरुन)

**कुमारी गर्भवती होऊन पुत्र प्रसवेल व त्याला इम्यानुएल म्हणतील; या नांवाचा अर्थ, आम्हां बरोबर देव, असा आहे. तेव्हा झोपेंतून उठल्यावर योसेफाने त्याला प्रभूच्या दूतानें आज्ञा दिल्याप्रमाणे केले; त्याने आपल्या स्त्रीचा स्वीकार केला.** (मत्तय १:१८-२४)

योसेफापासून सुरुवात करुया. ख्रिस्त जन्माच्या गोष्टित योसेफ हा कमी मोलाचा किंवा कमी महत्वाचा आणि बहुतेकदा दुर्लक्षीत व्यक्ति असा पहावयास मिळतो. तो जणू आधार देणारे पात्र आहे. त्याच्याविषयी आपल्याला पूर्ण माहिती नाही. परंतु तो इतरांसारखा एक सामान्य तरुण आणि गरीब व्यक्ति होता. त्याच्याजवळ पैसे नाहीत, कदाचीत एका छोट्या गावात एक हलक्या प्रतिचे काम करीत असेल. आणि या व्यतिरिक्त आपल्याला एवढेच माहित आहे की त्याची मागणी झाली होती. योसेफाशी मरीयेशी मागणी झाल्यानंतर ती पवित्र आत्म्याचे बाळ तिच्यात असलेली अशी आढळली.

मित्रांनो, तुमच्या बाबतीत असे घडले तर तुम्ही विश्वास ठेवाल कां? ती एक हास्यास्पद, चिडआणणारी, तर्काविरुद्ध, अशी कधीही सांगण्यात आली नाही. अशी गोष्ट आहे. परंतु ती खरी आहे. आता ही योसेफासाठी परिक्षाच आहे.

आणि बायबल सांगते योसेफ धार्मिक

असून तिचा उघड अपमान करावयाची त्याची इच्छा नव्हती. त्याचा त्या गोष्टीवर विश्वास नव्हता, परंतु बायबल असे म्हणते **योसेफ धार्मिक असून तिचा उघड अपमान करावयाची त्याची इच्छा नसल्यामुळें तिला गुप्तपणे सोडण्याचा त्याने निश्चय केला.** (मत्तय १:९). त्या दिवसांत मागणी विवाहासारखीच होती. ती एक बंधनकारी करार होता. तुम्ही मागणी झाल्यानंतर ती सहजपणे मोडता येत नव्हती. मागणी मोडण्यासाठी अगोदर सुटपत्र द्यावे लागे. त्यामुळे त्याने गुप्तपणे तिला सोडण्याचा निश्चय केला. परंतु तो अशा विचारात असताना देवदूतानें त्याला स्वप्नात दर्शन दिले. तेव्हा **त्याने झोपेंतून उठल्यावर देवदूतानें त्याला आज्ञा दिल्याप्रमाणें केले. त्याने मरीयेचा पत्नी म्हणून स्वीकार करुन तिला आपल्या घरी नेले.** (मत्तय १:२४). अशक्य, असंभवनीय अशा गोष्टीवर विश्वास ठेवल्यास आणि त्याच्या जीवनाकरिता त्याने कल्पना देखील केली नव्हती. त्याहूनही मोठी आणि अधीक उत्तम अशी देवाची योजना आहे असा भरवसा ठेवण्यांस फार मोठ्या विश्वासाची गरज होती.

येथे पहिला मुद्दा आहे, ज्याची आपण नोंद घ्यावी :- देवाद्वारे तुम्हाला आशीर्वाद हवा असेल, तुमच्या व्यापारावर, तुमच्या विवाहावर, तुमच्या नातेसंबंधावर, तुमच्या मैत्रिवर, तुमच्या पैशांवर, तर तुमच्या जीवनाकरिता तुमच्या स्वत:च्या योजनांचा पाठपुरावा करण्याचे थांबवून, योसेफाने जसे देवाची योजना पूर्ण व्हावी यासाठी सहकार्य केले. तसेच तुम्ही देखील करावे. योसेफाच्या जीवनाला तेथे पूर्ण कलाटणी मिळाली. त्याची मरीयेबरोबरच्या जीवनाबद्दल योजना होती. तुम्ही जरी तुम्हाला अर्थ वाटत नसेल तरी देखील तुमच्या जीवनासाठी असलेल्या देवाच्या योजनेशी तुम्ही सहकार्य करा. कारण तो पुढे कालांतराने अर्थपूर्ण होईल.

प्रिय मित्रांनो, देवाकडे मोठी योजना आहे. बायबल म्हणते, '**परमेश्वर म्हणतो, तुम्हाविषयी माझ्या मनांत जे संकल्प आहेत ते मी जाणतो, तें संकल्प हिताचें आहेत, अनिष्टाचे नाहीत, ते तुम्हांस तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत**''. (यिर्मया २९:११). देव म्हणतो, मी जे कांही करतो ते मला माहित आहे. ते सर्व मी योजीलेले आहे. हिताचे संकल्प, तुमची काळजी घेण्याकरिता, तुम्हांस इजा पोंहचविण्या करीता नाही. देव चांगला देव आहे. माझे संकल्प तुमच्या भावी सुस्थितीसाठी आहेत. तुम्ही देवावर भरोसा ठेविता कि तुमच्या स्वत:च्या योजनांवर? तुम्हाला तुमच्या जीवनात देवाचे आशीर्वाद हवे असतील तर तुमच्या जीवनाकरीता असलेल्या त्याच्या योजनेशी तुम्ही सहकार्य केले पाहिजे. हेच कारण होते - योसेफाचे पहिल्या ख्रिस्तजन्मात असल्याचे. तद्वतच, योसेफाप्रमाणे आपण देखील आपल्या जीवनाकरीता असलेल्या देवाच्या योजनेस सहकार्य केले पाहिजे.

## २) मेंढपाळांनी आनंद साजरा केला !

''**तेव्हा देवदूत त्यांस म्हणाला, भिऊ नका; कारण पाहा, जो मोठा आनंद सर्व लोकांस होणार आहे त्याची सुवार्ता मी तुम्हांस सांगतो, ती ही की तुम्हांसाठी आज दाविदाच्या गांवात तारणारा जन्मला आहे, तो ख्रिस्त प्रभु आहे,**'' (लूक २:१०-११)

समाजात मेंढपाळ अगदी खालच्या स्थानावर आहेत. रोमी साम्राज्यात आणि नव्या कराराच्या काळात ते गृहहीन असे होते. त्यांच्या शरिरांला मेंढरांची दुर्गंधी येत होती, शरीर मलीन आणि कपडे घामानें ओले असत. जन्मदिनाच्या मेजवानीला त्यांना पाहुणे म्हणून कोणी आमंत्रण देत नसत कारण त्यांच्या उपस्थितीमुळे पूर्ण परिसरात दुर्गंध पसरण्याची शक्यता असे. समाजात त्यांना अजीबात सन्मान मिळत नसे; असे असताना देखील देव स्वर्गातून खाली उतरला त्यांना त्यांच्या पुत्राच्या जन्माचे आमंत्रण देण्यास गेला. ते दररोज रात्री त्यांच्या मेंढरांचे लांडग्यां पासून आणि इतर हिंस्र श्वापदापासून रक्षण करण्यास गवतावर झोपत असत. बायबल असे म्हणते, मध्यरात्रीस दूत अवतरतात आणि आकाश प्रकाशले आणि देवदूत त्यांस म्हणाला, ''भिऊ नका, कारण पाहा, जो मोठा आनंद सर्व लोकांस होणार आहे. त्याची सुवार्ता मी तुम्हांस सांगतो.'' प्रत्येक वेळेस देवदूत प्रकट होतो, तेंव्हा त्याला ''भिऊ नका' अशा शब्दांनी सुरुवात करावी लागते कारण त्याला पाहाताच तुम्ही भितीने गर्भगळीत व्हाल. मोठ्या आनंदाची सुवार्ता ही सर्वांकरिता असणार. ख्रिस्तजन्म हा केवळ ख्रिस्ती जनांकरीताच नाही तर तो सर्व लोकांकरीता आहे.

येशू केवळ विशिष्ट लोकांकरिताच नाही तर सर्वांकरीता आला आणि मृत्यु पावला.

(...पान ६ वर)


# नहेम्या बाईबल कॉलेज

**निवासी आणि सायंकाळीन कॉलेज**
**वेलाचेरी आणि चेपॉक संतोषपुरम**

ECHO OF HIS CALL (ECHO GROUP)

Regd. Candidate for Membership ATA NEHEMIAH BIBLE COLLEGE CHENNAI ★ ECHO OF HIS CALL ★ Estd. 1969

**माध्यम : हिंदी/इंग्लीश**

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र
**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि**
**वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**सर्टिफिकेट इन थियॉलॉजी : कालावधी एक वर्ष**
**डिप्लोमा इन थियॉलॉजी : कालावधी दोन वर्षे**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**
**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
✲ ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे ✲

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ डिसेंबर २०२२ ते १८ जानेवारी २०२३ पर्यंत

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## ✝ स्तुति करिता मुद्दे

**१९ डिसेंबर** : शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय कार्यक्षम कारागीरांसहित सतत कार्यरत असल्या बद्दल.

**२० डिसेंबर** : सर्व प्रकारच्या दुष्ट शक्तिंपासून देवाने आमच्या वरिष्ठ पाळकांचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे रक्षण केल्या बद्दल.

**२१ डिसेंबर** : आमच्या सर्व सहसंपादक आणि त्यांच्या कुटुंबियांकरीता.

**२२ डिसेंबर** : दयाळूपणाने, शुभवर्तमान न पोंहचलेल्या विभागात ते घेऊन प्रवेश करण्यास मदत केल्या बद्दल.

**२३ डिसेंबर** : आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल, नहेम्या बायबल कॉलेज** आणि पत्रव्यवहारा द्वारे **थियॉलॉजीकल अभ्यासक्रमा**च्या द्वारे सर्व गरजवंताची सेवा करु दिल्या बद्दल.

**२४ डिसेंबर** : आमच्या सहसंपादक, समन्वयक आणि त्यांच्या कुटुंबिया बद्दल.

**२५ डिसेंबर** : जगताचा उद्धारक/तारणारा, येशू ख्रिस्त आपणा सर्वांना वाचविण्यास जन्मला.

**२६ डिसेंबर** : करोना महामारीचा संसर्ग कमी होत आहे त्या बद्दल.

**२७ डिसेंबर** : आमच्या कर्मचाऱ्यांवरील आशीर्वादाच्या वृष्टि बद्दल.

**२८ डिसेंबर** : मिशन क्षेत्रातील सेवकांच्या समर्पितपणा बद्दल.

**२९ डिसेंबर** : वर्षभरात सर्व ख्रिस्ती संस्थाना सुरळीत काय करता आल्या बद्दल.

**३० डिसेंबर** : वर्षभर त्याच्या सेवकांना दैवी आशीर्वाद आणि सुरक्षा पुरविल्या बद्दल.

**३१ डिसेंबर** : वर्षभरातील सेवाकार्या संबंधातील सर्व गरजा अद्भूतरित्या पुरविल्या बद्दल.

**०१ जानेवारी** : २०२२ सालात जगभरातील सर्व वाचकांना शांति दिल्या बद्दल आणि २०२३ सालात प्रवेश करु दिल्या बद्दल.

**०२ जानेवारी** : आमच्या मुख्य मंडळीत आणि शाखा मंडळ्यांत विश्वासणाऱ्यांची अधीक भर घातल्या बद्दल.

**०३ जानेवारी** : २०२३ करीता सर्व मंडळ्यांना आणि विश्वासणाऱ्यांना उत्तम अभिवचन दिल्या बद्दल.

## ✝ प्रार्थने करीता मुद्दे

**०४ जानेवारी** : **एको ऑफ हिज कॉल**च्या प्रसार माध्यम सेवेसाठी व्हिडीयो कॅमेरा उपलब्ध व्हावा.

**०५ जानेवारी** : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल**चे प्रिन्सिपल, शिक्षक वर्ग, विद्यार्थी आणि कर्मचारी, **नहेम्या बायबल कॉलेज**, पत्रव्यवहारा द्वारे करण्यात येत असलेल्या अभ्यासक्रम या सर्वांची.

**०६ जानेवारी** : जगभरातील सर्व ख्रिस्ती शिक्षण संस्थांनी उत्तम प्रतिष्ठा राखल्या बद्दल.

**०७ जानेवारी** : सर्व कुटुंबात शांति नांदावी.

**०८ जानेवारी** : जगभरातील सर्व लोकांचे नविन रोगांपासून रक्षण व्हावे व त्यांना उत्तम आरोग्य उपभोगता यावे.

**०९ जानेवारी** : जगातील लोकांच्या वैयक्तिक उत्पन्नात वाढ व्हावी.

**१० जानेवारी** : दुष्ट शक्तिंपासून मंडळ्यांना दैवी रक्षण प्राप्त व्हावे.

**११ जानेवारी** : जगभरातील सर्व पुढाऱ्यांना दैवी शहाणपण प्राप्त व्हावे व त्यांनी लोकांच्या कल्याणासाठी कार्य करावे.

**१२ जानेवारी** : सर्व ख्रिस्ती मंडळ्याची आणि संस्थांची सरकार मध्ये कायदेशील नोंदणी व्हावी.

**१३ जानेवारी** : तरुणांमधील हिंसाचार आणि खून करण्याची दुष्ट शक्ति निघून जावी आणि त्यांनी पवित्र आत्म्याने भरुन जावे.

**१४ जानेवारी** : देशा-देशांमध्ये शांतीत आणि आर्थिक प्रगती व्हावी.

**१५ जानेवारी** : एको ऑफ हिज कॉल विविध सेवाकार्य आशीर्वादीत व्हावे.

**१६ जानेवारी** : ख्रिस्तीजनांनी देवाच्या वचनाला अनुसरावे आणि ख्रिस्तसदृष्य स्वभाववृत्ति बाळगावी.

**१७ जानेवारी** : देवाचा शक्तिशाली हात २०२३ सालात देखील पास्टर एम्. सॅम सेलवा राज आणि त्यांच्या कुटुंबावर असावा.

**१८ जानेवारी** : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीव भागीदार, महान आज्ञापालनातील भागीदार आणि या सर्वांच्या कुटुंबियांवर आशीर्वाद असावा.

(पान ४ वरुन)

हि सुवार्ता सर्वांकरीता आहे. आणि ती म्हणते, आज दाविदाच्या नगरात तुम्हांकरिता तारणारा जन्मला आहे. तो तुमच्याकरिता लाभ आहे आणि तो ख्रिस्त प्रभु आहे. मेंढपाळ बेथलहेमास धांवत जातात. आपण लूक २:१६-१८ या वचनांत वाचतो, "**तेंव्हा ते घाईघाईने गेले तो मरीया, योसेफ व गव्हाणीत निजविलेले बाळक ही त्यांस आढली. त्यांनी त्यांस पाहिल्यावर त्या बाळकाविषयी देवदूतानें जी गोष्ट त्यांस सांगितली होती ती त्यांनी कळविली. मग सर्व ऐकणाऱ्यांनी त्या मेंढपाळांनी सांगितलेल्या गोष्टींविषयी आश्चर्य केले.**"

मेंढपाळ घाईघाईने बेथलहेमास गेले आणि तेथे त्यांना मरीया योसेफ व गव्हाणित निजलेले बाळ पहावयास मिळाले. ते पाहिल्यानंतर आनंदाने गात आणि देवाला धन्यवाद देत आपल्या कळपाकडे माघारी गेले. ते पार्टी करीत आहेत आणि देवदूतानें त्यांना सांगितलेले सर्व काही पाहिल्यामुळे देवाला धन्यवाद देत आहेत. ते आनंद उत्सव करीत आहेत. योसेफाला सहकार्य करावे लागले. परंतु मेंढपाळांनी आनंद उत्सव साजरा केला. ते पार्टी करीत आहेत. ख्रिस्तजन्मदीन एक सण आहे, प्रेतक्रिया नाही. यामुळेच आपण 'मेरी ख्रिसमस' म्हणत असतो.

ख्रिस्ताचा जन्म हि सर्व लोकांसाठी मोठी आनंदाची सुवार्ता आहे. "तुम्हांसाठी आज दाविदाच्या गावांत तारणारा जन्मला आहे; तो ख्रिस्त प्रभु आहे. **हि एक उत्तम बातमी आहे.** तुम्हाला पापांची क्षमा मिळू शकते. तुम्हाला जीवनाकरिता एक उद्देश प्राप्त होऊ शकतो. ख्रिस्तजन्मामुळे तुम्हाला स्वर्गात जागा प्राप्त होऊ शकते. हा आनंदाचा प्रसंग आहे. आता येथे हा दुसरा मुद्दा आहे. तुम्हाला आशीर्वादीत व्हावयाचे असेल, तर मेंढपाळाप्रमाणे तुम्ही आनंद व्यक्त करावयास हवा. कारण देव आमच्या सोबत आहे. ख्रिसमसच्या दिवसात लोक इतर सर्व प्रकारे तो साजरा करीत असलेले पाहता भयानक वाटते. सर्व तऱ्हेने ख्रिस्तजन्म सोहळा साजरा केला जातो परंतु त्यांत येशूचा उल्लेख देखील केला जात नाही. तरी देखील "आमच्या सानिध्य देव" हा सोहळा साजर करण्यामागे कारण असते. तो या धर्तीवर आला, या जगात आपण एकटे नाही. तुमच्या जीवनाकरीता त्याजकडे योजना अणि उद्देश आहे. तो आमच्यावर प्रेम करीतो, आम्हाला क्षमा करीतो आणि आपल्या जीवनाकरिता त्याजकडे योजना आहे.

मेंढपाळांनी केवळ आनंद व्यक्त केला नाही तर इतरांना त्याविषयी सांगितले. असे म्हटले आहे कि त्यांनी सर्वांना ती बातमी आणि पाहिलेले सर्व कळविले. तुम्ही कोणाला तरी सुवार्ता सांगुन किती दिवस झाले? जगात एकदा तरी, कोणाला तरी तुम्ही सुवार्ता सांगितली आहे कां? जी सुवार्ता आपल्याकडे आहे, तीमध्ये पापांची क्षमा, आपल्या जीवनाकरिता उद्देश आणि स्वर्गात जागा. यावर जे कोणी विश्वास ठेवितील आणि येशूचा स्विकार करीतील त्या सर्वांकरीता उपलब्ध आहे. मित्रांनो, तुम्ही ही सुवार्ता कोणाला तरी सांगितली आहे कां? वचनात असे सांगितले आहे, जे, जे त्यांना भेटले किंवा जात असताना वाटेत समोर आलेल्या सर्वांना त्यांनी सुवार्ता सांगितली. अशा रितीने मेंढपाळांनी आनंद साजरा केला आणि योसेफाने सहकार्य केले. मेंढपाळांप्रमाणे, देव येथे आमच्या सानिध्य आहे त्याबद्दल आनंद व्यक्त करा आणि तारणाची सुवार्ता इतरांना कळवा.

## ३) मरीयेने मनन केले !

"**त्यांनी त्यांस पाहिल्यावर त्या बाळकाविषयी देवदूतानें जी गोष्ट त्यांस सांगितली होती ती त्यांनी कळविली. मग सर्व ऐकणाऱ्यांनी त्या मेंढपाळांनी सांगितलेल्या गोष्टीविषयी आश्चर्य केले, परंतु मरीयेनें या सर्व गोष्टींचे मनन करुन त्या आपल्या अंत:करणात ठेविल्या.**" (लूक २:१७-१९)

मरीया १३ वर्षे वयाची असेल, तरी तिचा योसेफाशी विवाह होण्या आधी ती गर्भवती अशी आढळली. तिची योसेफाशी केवळ मागणी झाली होती. देवाचा पुत्र तिच्या उदरात होता. यावर कोणीहि विश्वास ठेवू शकत नव्हता. मरीया घाबरली नाही. ती देवानें तिला दिलेल्या अभिवचनावर विचार करीत असल्यामुळे घाबरली नाही आणि योसेफाने सहकार्य केले असताना आणि मेंढपाळांनी आनंद साजरा केला असताना, मरीया विचार करीत होती - मनन करीत होती. ती देवाच्या अभिवचनाविषयी विचार करीत होती. "मेंढपाळांनी बाळकाविषयी



देवदूताने जी गोष्ट त्यांस सांगितली होती. ती त्यांनी कळविली, मग सर्व ऐकणाऱ्यांनी आश्चर्य केले, परंतु मरीयेनें या सर्व गोष्टिंचे मनन करुन त्या आपल्या अंत:करणात ठेविल्या." इतर सर्व तरुणींमधून आशीर्वाद देण्यासाठी देवाने मरीयेला निवडीले, कारण तीने देवाच्या वचनाकडे लक्ष दिले. देव बोलला तेंव्हा तिने ऐकले. तिने केवळ ऐकलेच नाही तर ते आठवणीत ठेविले, सर्व कांही शांतपणे मनन करणे सुरु ठेविले. देवदूताने जे सांगितले ते सर्वांनी ऐकले आणि आश्चर्य केले. परंतु मरीयेने मनन केले. यांत फार मोठा फरक आहे. मित्रांनो. तुम्ही जर वचनावर विश्वास ठेवणारी व्यक्ति आहात. तर विश्वास बसणार नाही अशा रितीने देव तुम्हाला आशीर्वाद देईल. तुम्ही जगाची व्यक्ति असाल, तर आशीर्वादाला जागा नाहि, कारण तुम्ही वचना विषयी विचार करीत नाही, तुम्ही जगाचा विचार करीत आहात, जगातील घडामोडींविषयी विचार करीत आहात.

मरीयेप्रमाणे तुम्हाला आशीर्वाद हवा असेल, तर तुम्ही सतत देवाच्या वचनावर मनन केले पाहिजे. बायबल सांगते मरीयेने सर्व गोष्टिंचे मनन करुन त्या आपल्या अंत:करणात ठेविल्या. देवाच्या वचनांवर सतत मनन करीत राहा. आता हे अभिवचन केवळ स्त्री (मरीये) करीताच नाही. ते जे सर्व वचनावर प्रेम करीतात, शिकतात आशा सर्वांकरीता आहे - "**परंतु स्वातंत्र्याच्या पूर्ण नियमांवर नजर टाकून जो त्याकडे लक्षपूर्वक पाहत राहातो तो ऐकून विसरणारा असा न होता कृती करणारा होतो व आपल्या करण्यांत धन्यता मिळवितो.**" (याकोब १:२५)

तुम्हांस मुक्त करणाऱ्या देवाच्या परिपूर्ण अशा वचनाचा तुम्ही काळजीपूर्वक अभ्यास केला, तर सत्य तुम्हांस स्वतंत्र करील. ते

सांगते ते जर तुम्ही केले तर तुम्हांस आशीर्वाद प्राप्त होईल. तुमच्या घरात किंवा कार्यालयीन टेबलावर बायबल ठेवलेले असल्यामुळे, तुम्हाला देवाकडून आशीर्वाद मिळू शकणर नाहीत, तर त्याचे वाचन, अभ्यास, पाठांतर, मनन, विचार, अंत:करणात साठवून, त्याचे जीवनाला लागूकरण केल्यामुळे आणि त्यानुसार केल्यामुळे आशीर्वाद प्राप्त होऊ शकतात. याप्रमाणे अढळ राहून पालन करीत राहिल्यास तुम्ही आशीर्वादीत व्हाल.

"**नियमशास्त्राचा हा ग्रंथ तुझ्या मुखांतून कदापी ढळू नये; त्यांत जे कांही लिहीले आहे ते तूं मान्य करून पाळावे, म्हणून रात्रदिवस तूं त्याचे मनन करावे, म्हणजे तुझा मार्ग सुखाचा होऊन तुला यश प्राप्ति घडेल.**" (यहोशवा १:८). तेव्हा या वचनात सांगण्यात आले आहे देवाचे वचन लक्षात असू द्या ते अभ्यासा त्यावर मनन करा आणि त्याचे पालन करा. असे केल्यास तुम्ही समृद्ध आणि यशस्वी व्हाल असे देवाचे आश्वासन आहे. देव काही मनुष्य नाही की त्याने लबाडी करावी. जितक्या आधीक प्रमाणात तुम्ही देवाचे वचन अनुसराल, तितक्या अधीक प्रमाणात, देव तुमच्या जीवनात यश देवू शकतो. समृद्ध आणि यशस्वी होण्यासाठी हेच एक आश्वासन आहे. आणि ते विचार करण्याशी आणि अंत:करणात ठेवण्याशी आणि त्यानुसार करण्याशी जोडलेले आहे.

## ४) मागी (ज्ञानी) लोकांनी अर्पण केले!

"**घरात जाऊन त्यांनी बालकास त्याची आई मरीया इच्याजवळ पाहिले, पायां पडून त्याला नमन केले, आणि आपल्या द्रव्यांच्या थैल्या सोडून सोने, ऊद व गंधरस ही दाने त्याला अर्पिली**". (मत्तय २:११)

मागी (ज्ञानी) लोक हे इराक किंवा इराण देशातील राजकीय सल्लागाराप्रमाणे आणि खगोलशास्त्रज्ञ होते. दानिएलाला देखील मागी बनण्याचे प्रशिक्षण देण्यात आले होते. पूर्व देशातील हे मागी किंवा ज्ञानी लोक हे पृथ्वीतलावरील सर्वात अधिक शिक्षीत असे लोक होते. ते शास्त्रज्ञ होते, विद्वान होते. ते खगोलशास्त्रात, आरोग्य, भाषा आणि साहित्यीक या क्षेत्रात पारंगत होते. हे लोक मेंढपाळांच्या अगदी विरुद्ध स्थितीचे होते. हे मागी (ज्ञानी) पूर्व देशांतून बेथलहेमकडे प्रवास केला.

इराक, इराण, पर्शिया किंवा बाबेल येथून बेथलहेमास प्रवास करण्यास पुष्कळ समय लागणार होता. परंतु ते श्रीमंत होते आणि त्यांना त्यांचा पुष्कळचा वेळ द्यावा लागणार होता. तरी देखील त्यांनी तो प्रवास केला, कारण ते बुद्धिमत्तेचे काम होते. त्यांनी आकाशात तारा पाहिला होता. त्यावर त्यांनी शास्त्राचा, हस्तलिखीत प्रतिंचा, परंपरा यांचा अभ्यास केला. हा तारा जगाचा उद्धारक-तारणारा बेथलहेमात जन्मास येणार आहे. त्यामुळे पुष्कळसा पैसा आणि वेळ खर्च करुन ते बेथलहेमाच्या प्रवासात निघाले. जे सत्य शोधीत आहेत, ते देवाचा शोध घेत आहेत. जी नेहमीच शहाणपणाची गोष्ट आहे.

प्रिय मित्रांनो, तुम्ही सत्य शोधीत आहात कां? आहात तर मग येशऊचे स्वागत करा. तो तुमचा स्विकार करण्यास तयार आहे. येशूकडे येण्याकरीता, तुम्हाला काही विशेष असे करावयाचे नाही, तुम्ही आहात त्या स्थितीत त्याजकडे या आज देखील ज्ञानी लोक येशूला शोधीत आहेत. केवळ मुर्ख लोक त्याला शोधीत नाहीत. मूर्ख संपूर्ण जीवनात तयारी करीत नाहीत आणि शेवटी अपरिहार्य किंवा चुकवता येणार नाही अशा मृत्युला सामोरे जातात.

जेव्हा मागींनी (ज्ञान्यांनी) बाळाला त्याची आई मरीया हिजबरोबर पाहिले,

(पुढील पान ९ वर)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## कर सवलत

*to donations received for Educational and Medical Aid for under-privileged*

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST |
| Account Number | : | 1023 2923 805 |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Branch | : | TRIPLICANE, CHENNAI - 600 005 |
| IFSC Code | : | SBIN 0000249 |
| SWIFT Code | : | SBI NIN BB 455 |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**"नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !" (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

# देव दूर्बळांच्या प्रार्थनेस उत्तर देतो! GOD ANSWERS PRAYER OF THE WEAK!

मी देवाच्या कृपेद्वारे १०.०८.१९६९ साली सेवा प्रशिक्षण, हस्तपत्रिका वितरण, प्रार्थना सभांचे पुढारपण आणि मंडळ्यांमध्ये



वचनावर संदेश देण्या द्वारे माझ्या सुवार्ता सेवा कार्यास सुरुवात केली.

मी या सेवेच्या क्षेत्रात नवीन आणि तरुण असल्यामुळे मला देवाचा सेवक म्हणून कोणी देखील मान्यता दिली नाही. शिवाय सेवा सुरु ठेवण्याकरीता माझ्यापुढे आर्थिक अडचण होती. परिणामी सेवा सुरु ठेवण्याकरिता मला दररोज अनेक मैल पायी चालावे लागत होते. त्यामुळे दूरवर चालणे आणि उपासमार हे माझ्या सेवेचा भाग झाले होते. सेवे करीता मोठ्या प्रमाणात पैशांची गरज होती; आणि वाद्य खरेदी करण्याची.

सेवेच्या अगदी सुरुवाती पासूनच मी दृढ निश्चय केलेला होता, कि माझ्या मित्रांकडे आणि नातेवाईकांकडे कोणत्याहि प्रकारच्या आधाराची - मदतीची विनंती करणार नाही. कारण देवानेच मला सेवेकरीता पाचारण केलेले आहे आणि त्यानेच मला त्याच्या सेवेकरीता पुरवठा करावयाचा आहे. देवाने मला आजपर्यंत या तत्वाला धरुन राहाण्यास मदत केली आहे. या तत्वाला अनुसरल्यामुळे मला वर्णन न करता येणाऱ्या अनेक कठीण प्रसंगांना आणि आवाहनांना सामोरे जावे लागले.



एका विशिष्ठ परिस्थिती हाताळू न शकल्यामुळे मजवर मानसिक आणि शारिरीक बाधा झाली. माझे एक नातेवाईक मिस्टर स्वर्णराज यांनी मला शासकीय परिवहन खात्यात नोकरी मिळण्याकरिता प्रयत्न केला; पालापल्लम, माथीकोडे येथील देवाचे सेवक कालेब यांनी आणि आणखी एका मित्राने खाजगी कंपनीत नोकरी मिळावी यासाठी प्रयत्न केले; परंतु दोघांनाही त्यात अपयश आले.

अशा स्थितीत, १७.०५.१९७१ रोजी मी उपासात असताना देवाच्या आत्म्याने मला मी कायमस्वरुपी नोकरी मिळावी यासाठी अतिशय प्रखरतेने प्रार्थना करण्यासाठी मार्गदर्शन केले. प्रार्थनेच्या परिणामात, मला अशा शब्दात निश्चित खात्री मिळाली, "महिन्याभराच्या आत मी तुला एक कायम स्वरुपी नोकरी देईन व त्यावर तू जगू शकशील". शास्त्रवचनानुसार - "**त्याविषयी आपल्याला जो भरवसा आहे तो हा आहे की आपण त्याच्या इच्छे प्रमाणें कांही मागितले तर तो आपले ऐकेल; आपण मागतो त्याविषयी तो आपले ऐकतो हे आपल्याला ठाऊक आहे; म्हणून जी मागणी आपण त्याच्या जवळ मागितली आहेत ती आपल्याला मिळाली आहेत हेहि आपल्याला ठाऊक आहे**". (१ योहान ५:१४-१५). ती नोकरी मिळाली आहे अशा विश्वासाने, मी त्या कामावर रुजु होण्याची शक्य ती तयारी केली.





अनेक जण, ज्यांनी माझा उद्योग पाहिला, त्यांना माझ्या मानसिक स्थिती विषयी संशय येऊ लागला. परंतु मी त्याकडे लक्ष न देता, देवावर पूर्णपणे विश्वास ठेविला.

जस जसे दिवस सरत गेले, मी दररोज पोस्टमन येण्याची अपेक्षा करीत होतो. संपूर्ण महिना संपल्या नंतर, प्रभुवर विश्वास ठेवून १८.०६.१९७१ रोजी पोस्टऑफीस मध्ये गेलो. पोस्टमन नेल्लाइपन यांनी मला पाहाताच खुणावले कि माझ्या करिता कोणतेही टपाल नाही. तरी देखील देवाच्या अभिवचनाला बिलगून, मी त्याच ठिकाणी बसून प्रार्थना करु लागलो. मला आश्चर्य वाटले, कांही मिनिटातच त्याच पोस्टमनने मला म्हटले, सॅम तुझ्या नांवाचे एक रजीस्टर पत्र आहे; सही करुन ते घे." पत्र उघडताच, त्यात मला चेन्नईच्या TNPSC कार्यालयातून श्रम विभागात कामावर माझी नेमणूक झाल्याचे कळले. जो मी कांही वर्षांपूर्वी दिलेल्या परिक्षेचा निकाल होता. माझ्या प्रार्थनेमुळे ते त्वरेने घडून आले.

तो चमत्कार घडला. होय, प्रार्थना हे एक आत्मिक शस्त्र आहे. मी चेन्नईला आलो आणि आनंदाने कामावर रुजु झालो. माझ्या पगारांतील



१९९४ साली नोकरी सोडताना माझ्या सहकार्यांन बरोबर





**१९९४ साली मी नोकरी सोडताना माझ्या सहकार्यकरां सोबत फॅक्टरीचे मुख्य निरिक्षक श्री. अे. शेनबागम, बी.ई.**

मोठा हिस्सा हा माझ्या सेवेसाठी खर्च हेत होता. पुढे १९९४ साली, देवाने मला सरकारी नोकरी सोडून देवून पूर्ण वेळ सेवेत येण्यास आज्ञापिले; मी त्याच्या आज्ञेचे पालन केले व पूर्ण वेळ सेवेत पदार्पण केले.

**आपला देव चांगला आहे! तो वक्तशीर आहे!! त्याला घट्ट मिठी मारुन राहा!!! तो आज बारकाईने तुमच्याकडे पाहात आहे.**

**"ज्याचें मन तुझ्या ठायी स्थिर झाले आहे त्यांस तूं पूर्ण शांति देतोस, कारण त्याचा भाव तुजवर असतो."** (यशया २६:३)***

पान ७ वरुन

त्यांनी पाया पडून त्याला नमन केले. **"घरात जाऊन त्यांनी बालकास त्याची आई मरीया हिच्याजवळ पाहिले, पाया पडून त्याला नमन केले आणि आपल्या द्रव्यांच्या थैल्या सोडून सोने, ऊद व गंधरस ही दाने त्याला अर्पिली."** (मत्तय २:११)

लक्षात घ्या, त्यांनी मरीयेच्या पाया पडून, तिला नमन केले नाही. ती तेथेच घरात होती. त्यांनी येशूच्या पाया पडून त्याला नमन केले. त्यानंतर त्यांनी आपल्या द्रव्याच्या थैल्या उघडून त्याला सोने, ऊद आणि गंधरस अर्पिले. त्यांनी अर्पिलेल्या या तीन भेट वस्तू येशू अपल्या करीता त्याच्या जीवन, मृत्यु आणि पुनरुत्थाना द्वारे काय करणार होता त्याची खूण-चिन्ह दर्शविते. **स्वप्नात देवाकडून त्यांना सूचना करण्यात आल्याप्रमाणे ते दुसऱ्या मार्गाने स्वदेशास गेले.** तुम्ही कधी तरी येशू सोबत राहिल्यास तुमच्या मार्गात बदल होईल, तुमच्या चालण्यात बदल होईल. आपल्याला देव इतका मोठा असा दुसरा कोणी तरी जीवनात येईल आणि आपल्यात बदल घडवू शकणार नाही. तुम्ही तुमच्या जीवनात देव आहे असे समजत असाल आणि तुमच्यात बदल घडला नसेल, तर तो देव नसुन दुसरा कोणीतरी असणार. तुमच्या मार्गात बदल केल्याशिवाय तो तुमच्या जीवनात येऊ शकणार नाही.

त्या मार्गीना (ज्ञानी लोकांना) येशूकडे येण्यास फार मोठी किंमत द्यावी लागली. तरी जेव्हा त्यांनी त्याला पाहिले त्याच्या पाया पडून त्याला नमन केले. **येथे आपल्याकरीता चवथा धडा आहे, आणि तो म्हणजे, जर तुम्ही आशीर्वादीत होऊ इचिछता, तुमचे जीवन आशीर्वादीत व्हावे असे इच्छित असाल, तर तुम्ही मागी लोकांप्रमाणे तुमचा वेळ आणि दाने येशूला समर्पित करा.** त्यांनी येशूसाठी दाने आणिली. तुमच्या जीवनात तुमच्याकडे ज्या गोष्टि आहेत, त्या सर्व देवापासूनच प्राप्त झालेल्या आहेत. त्याने दिल्या शिवाय तुमच्याकडे काहीच नसणार. जे त्याच्या द्वारे प्राप्त झाले, तेच त्याला परत द्यावे, तो ते स्विकारतो आणि गुणाकाराने ते परत करीतो. "तुम्ही आपल्या शरीरांचा जीवंत पवित्र व देवाला प्रिय असा यज्ञ करा." **"श्री देवाच्या करुणांमुळे तुम्हांस विनवितो की तुम्ही आपल्या शरीरांचा जीवंत, पवित्र व देवाला प्रिय असा यज्ञ करावा; ही तुमची आध्यात्मिक सेवा आहे."** (रोम १२:१). तेव्हा आपण स्वत:चा वेळ, आपले जीवन आणि दाने त्याला समर्पित करुया.

**"आणि तुम्ही आपले अवयव अनीतीची शस्त्रें होण्याकरिता पापाला समर्पण करुं नका; तर आपण मेलेल्यांतून जीवंत झालेले असे स्वत:स देवाला समर्पण करा; आणि आपले अवयव नीतीची शस्त्रें होण्याकरितां देवाला समर्पण करा."** (रोम ६:१३). यापेक्षा अधीक शहाणपणाचे असे कांही असू शकत नाही. जे टिकणार नाही अशा कोणत्याही गोष्टित स्वत:स समर्पित करु नका, तर टिकणाऱ्या अशा गोष्टिस समर्पित व्हा. तुमच्या सर्वस्वाचा पूर्ण भाग देवाला त्याच्या चांगल्या कामाकरिता अवजार म्हणून उपयोग करुन घेता येईल या करीता द्या.

## येशूला तुम्ही काय देणार आहात?

या ख्रिस्तजन्माच्या मोसमात तुम्ही इतरांना भेटी देण्याकरीता, त्या खरेदी करण्यात पुष्कळा पैसा, वेळ, विचार खर्च करणार आहात. या ख्रिसमसला तुम्ही आपल्या प्रभु येशूला काय देणार आहात? कोणत्याहि जन्मदिनाच्या पार्टीमध्ये ज्याचा जन्मदिन आहे त्याला वगळून इतर सर्वांना भेट वस्तू देण्याचा विचार देखील आपण करु शकत नाही. या ख्रिस्तजन्मदीनाच्या दिवशी या वर्षी त्याला तुम्ही स्वत:स पूर्णपणे समर्पित व्हा. तीच उत्तम भेट असू शकते. त्या भेटीचा तो आनंदाने स्विकार करील.

मागी (ज्ञानी) लोकांनी ख्रिस्तजन्मदीनाला भेट वस्तू देण्याची प्रथा सुरू केली. त्यांनी येशू करीता भेटी आणल्या आणि आता आपण एकमेकांना भेंटी देवू लागलो आहोत. परंतु खऱ्या अर्थी त्याची सुरुवात देवाने आपल्याला त्याच्या पुत्र देऊन केली. "देवानें जगावर एवढी प्रीति केली कि त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला; यासाठी की जो कोणी त्याजवर विश्वास ठेविल त्याचा नाश हेऊ नये तर त्याला सार्वकालीक जीवन प्राप्त व्हावे." देवाने ही दिलेली पहिली ख्रिसमस भेंट.

**योसेफानें सहकार्य केले; मेंढपाळांनी आनंद साजरा केला, मरीयेने देवदूताच्या अभिवचनावर मनन केले व अंत:करणात ठेविले, आणि ज्ञानी लोकांनी येशूला त्याच्या भेटी अर्पिल्या आता या चार पैकी तुम्ही काय करुन देवाद्वारे आशीर्वादीत होण्याचा आणि इतरांकरीता आशीर्वाद होण्याचा निर्णय करीत आहात?**

************

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

## एको ऑफ हिज कोल
### एक चांगली संधी
### मासिक मोफत मिळवण्यासाठी

जर तुमच्या मित्र/नातेवाईकांना पत्ता पोस्टाने, पत्राने, इमेलने, वॉटस्अपने किंवा फोन द्वारा आम्हाला पाठविला, तर एको ओफ हिज कॉल मासिक त्यांनी मोफत पाठवुं.

## OUR BANK DETAILS:

*1. Bank : State Bank of India*

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

*2. Bank : ICICI Bank*

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

*3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-   आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th DECEMBER 2022**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**